RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३९] सोमवार, ऑक्टोबर १७, २०१६/आश्विन २५, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६.**—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. ... ... ... | पृष्ठे १-३ |


दिनांक १५ ऑक्टोबर २०१६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

२०१६ चा महा. अध्या. ५. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१६ हा दिनांक २ मार्च २०१६ रोजी प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक ९ मार्च २०१६ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६ (सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७) हे, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक ६ एप्रिल २०१६ रोजी संमत केले होते आणि महाराष्ट्र विधानपरिषदेकडे ते पारेषित करण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** त्यानंतर महाराष्ट्र विधानपरिषदेची दिनांक १३ एप्रिल २०१६ रोजी सत्र समाप्त झाल्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषदेत उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यानंतर म्हणजेच १९ एप्रिल २०१६ या दिनांकानंतर, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १८ एप्रिल २०१६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व दुसऱ्यांदा पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " दुसऱ्यांदा पुढे चालू ठेवणे अध्यादेश " असा करण्यात आला आहे) हा प्रख्यापित केला होता ; २०१६ चा महा. अध्या. ७.

**आणि ज्याअर्थी,** उक्त दुसऱ्यांदा पुढे चालू ठेवणे अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २ मार्च २०१६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (१४-अ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १९६१ चा महा. २४.

" (१४-अ) " कार्यलक्षी संचालक " याचा अर्थ, समितीने नामनिर्देशित केलेला, व्यवस्थापकीय संचालक किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी,—मग तो कोणत्याही पदनामाने संबोधण्यात येवो, असा आहे ;".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३अअअ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३अअअ मधील, पोट-कलम (२) मध्ये,—

(क) दुसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

" परंतु आणखी असे की, समितीस एका व्यक्तीला कार्यलक्षी संचालक म्हणून नामनिर्देशित करता येईल :

परंतु तसेच, राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, अधिसूचित करील अशा संस्थांच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या बाबतीत, जेथे संस्थेच्या स्थायी वेतनी कर्मचाऱ्यांची संख्या ही, पंचवीस किंवा त्यापेक्षा अधिक असेल तेथे, समितीमध्ये,—

(एक) जर ती समिती अकरापेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून बनलेली असेल तर, त्या संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या एका प्रतिनिधीचा समावेश असेल ; आणि

(दोन) जर ती समिती अकरापेक्षा अधिक असलेल्या परंतु एकवीसपेक्षा अधिक नसलेल्या सदस्यांची मिळून बनलेली असेल तर, त्या संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या दोन प्रतिनिधींचा समावेश असेल.

कर्मचाऱ्यांच्या अशा प्रतिनिधींची निवड ही, महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम किंवा महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९७१ अन्वये मान्यता दिलेल्या संघाकडून किंवा संघांकडून संस्थेच्या कर्मचाऱ्यांमधून करण्यात येईल, जेथे असा कोणताही मान्यताप्राप्त संघ नसेल, किंवा असे कोणतेही मान्यताप्राप्त संघ नसतील किंवा जेथे, मुळात कोणताही संघच अस्तित्वात नसेल किंवा, जेथे, एखादा संघ हा मान्यताप्राप्त आहे किंवा नाही यांसह अशा मुद्यांशी संबंधित विवाद असेल तेव्हा, संस्थेचे कर्मचारी आपल्यामधून, विहित केलेल्या रीतीने अशा कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींची निवड करतील. निलंबित असलेला कोणताही कर्मचारी हा, या परंतुकान्वये समितीचा सदस्य म्हणून निवड केली जाण्यास किंवा निवडून दिला जाण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास पात्र असणार नाही : १९४७ चा ११. १९७२ चा महा. १.

परंतु तसेच, तिसऱ्या परंतुकाच्या तरतुदींनुसार निवड केलेल्या किंवा निवडून दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींस समितीच्या बैठकींमध्ये भाग घेण्याचा अधिकार असेल, परंतु त्यास, त्यात मत देण्याचा अधिकार असणार नाही : " ;

(ख) तिसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :–

" परंतु तसेच, भागभांडवलाच्या स्वरूपात शासनाचा हिस्सा असलेल्या संस्थेच्या बाबतीत, समितीमध्ये, शासनाने नामनिर्देशित केलेल्या पुढील दोन सदस्यांचादेखील समावेश असेल, ते म्हणजे,–

(एक) सहकारी संस्थांच्या सहायक निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला एक शासकीय अधिकारी ; आणि

(दोन) शासन, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील असा, संस्थेच्या कार्यासंबंधीचा आवश्यक तो अनुभव असणारी व अशी अर्हता धारण करणारी एक व्यक्ती : ";

(ग) चौथे परंतुक वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३कअ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३कअ मध्ये पोट-कलम (१) मधील, खंड (सहा) मध्ये, " ७३अ " या मजकुराऐवजी, " ७३अअअ " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२०१६ चा महा. अध्या. ७.

सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती.

**५.** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व दुसऱ्यांदा पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.